ग्रँट मेडिकल कॉलेज

सर जमशेटजी जिजीभाई

नामदार जगन्नाथ शंकरशेट

मुंबईतील वैद्यकीय सेवा अप्रशिक्षित लोकांच्या हातात असल्यामुळे असंख्य लोक योग्य तो औषधोपचार न झाल्यामुळे नाहक मरण पावत. जगन्नाथ शंकरशेट यांचे स्नेही डॉ. मॅकी हे गरीबांना विनामूल्य औषधोपचार देत असूनही ते युरोपियन असल्यामुळे लोक त्यांच्याकडे जात नसत. एतद्देशीयांपैकी फार थोडे युरोपियन डॉक्टरांची फी देण्यास समर्थ होते. संस्था स्थापन करा त्या चिरकाल टिकतात या माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांच्या गुरु उपदेशाने जगन्नाथ शंकरशेट यांनी सार्वजनिक दवाखाना सुरु करणारी संस्था स्थापण्याचे सुतोवाच आपल्या युरोपियन व पारशी मित्रांशी केले. त्यांचा पाठिंबा मिळाला.

जगन्नाथ ऊर्फ नाना शंकरशेट, जमशेटजी जिजीभाई, फ्रामजी कावसजी यांच्यासारख्या लोकहित तत्पर नेत्यांनी रोग-परिहारार्थ उपाययोजना झाली पाहिजे या जाणीवेने धर्मार्थ दवाखाना स्थापण्यासाठी एक सभा आयोजित केली. तेथे **नेटिव्ह डिस्पेंसरी** स्थापन करण्याचा निर्णय घेतला. ही संस्था निम्न-शासकीय होण्यासाठी, गव्हर्नर यांच्याशी चर्चा केली. त्यांच्या सुचनेनुसार सर हर्बर्ट कॉप्टन यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील नागरिकांची एक सभा आयोजित करुन इस्पितळ उघडण्याच्या कल्पनेला मूर्त स्वरुप देण्याचे ठरले. ह्या संस्थेचे अध्यक्ष ना. जेम्स फॅरिस होते. व्यवस्थापक मंडळांत ११ युरोपीयन व ९ एतद्देशीय सभासद होते. सरकारने मासिक ३०० रुपये अनुदान मंजूर केले. हा दवाखाना आपल्या माणसाने सुरु केला आहे हे लक्षात आल्याने नागरिक औषध-उपचारासाठी येऊ लागले. डॉ. मोरहेड हे गव्हर्नरांचे सर्जन व शंकरशेट घराण्याचे फॅमिली डॉक्टर होते.

मध्यंतरीच्या काळात बॉम्बे बोर्ड ऑफ एज्युकेशनची निर्मिती झाली. तेथे ३ एतद्देशिय संचालकांची निवड झाली त्यात जगन्नाथ शंकरशेट होते. बॉम्बे बोर्ड ऑफ एज्युकेशन या संस्थेकडे इलाख्यांतील शिक्षण व आरोग्य हे विभाग दिले असल्यामुळे त्याचे एतद्देशिय संचालक जगन्नाथ शंकरशेट यांनी संस्थेचे अध्यक्ष न्या. पेरी यांच्या नेतृत्त्वाखाली मेडिकल कॉलेज व सुविधा असलेले हॉस्पिटल काढण्याचा निर्णय घेतला.

सर रॉबर्ट ग्रँट यांनी गव्हर्नर म्हणून राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर आरोग्य क्षेत्रांतील दैन्यावस्था त्यांच्या डोळयांत भरली. त्यांनाही शहरात वैद्यकीय सोयी वाढवायच्या असल्यामुळे संस्था सदस्यांमध्ये उत्साह वाढून हालचाली सुरु केल्या.

जनतेला योग्य वेळी योग्य ते वैद्यकीय सहाय्य मिळते की नाही, देशी वैद्यकशास्त्र हे कार्य कुठवर पार पाडीत आहे, त्याचे पायाशुद्ध शिक्षण दिले जाते की नाही, औषधोपचार करणाऱ्यांचे शिक्षण व त्या शास्त्रांतील त्यांचे प्राविण्य गरजा भागविणारे आहे की नाही वगैरे बाबतींत जरुर ती माहिती मिळविण्याच्या हेतूने एक प्रश्नावली तयार करवून ती तत्कालीन या शास्त्राशी संबंध असणाऱ्यांकडे आणि दर्पण वर्तमानपत्राचे संपादक बाळशास्त्री जांभेकर यांच्याकडे पाठविण्यात आली. त्यांनी माहिती गोळा केल्यावर एका स्तंभात लिहिले, ‘आपल्यांत पद्धतशीर शिक्षण घेतलेले वैद्य नसल्यामुळे केवळ निरुपायाने अननुभवी लोकांकडे जावे लागते.

मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल स्थापन केल्यास बॉम्बे बोर्ड ऑफ एज्युकेशनला अनेक लोकांचे प्राण वाचविल्याचेही श्रेय त्यांना मिळेल.'

बॉम्बे बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या संचालकानी, आरोग्य शिक्षणाला अग्रक्रम द्यावा असे ठरविले. ज्यांना शैक्षणिक परंपरा आहे, ज्ञान योग्यप्रकारे वापरण्याची कुवत आहे, धोरण समजून घेण्याची क्षमता आहे अशा लोकांना कॉलेज शिक्षण दिल्यास वेळ, कष्ट आणि पैसा तुलनेनं कमी खर्च होईल. तो समाज नवं शिक्षण पचवून जबाबदाऱ्या पत्करायला लवकर सिध्द होऊ शकेल अशी भूमिका होती. एतद्देशीयांना, वैद्यकीय, इंजिनिअरिंग शिक्षण देणे हाच मार्ग श्रेयस्कर होता. तेथे मेडिकल कॉलेज सुरु करण्याचे बीज रोवले गेले आणि मेकॉलेच्या, एतद्देशीयांना फक्त कारकून निर्माण करणाऱ्या धोरणांना नकळत शह देण्यास सुरुवात झाली.

गव्हर्नर ग्रँट यांचेशी संबंध वाढले

भिवंडी दंगल प्रकरणात लाचखाऊ पोलीसांनी योग्य पुरावे गोळा केले नसल्यामुळे मूर्ती भंग करुनही आरोपीना शिक्षा झाली नव्हती. जगन्नाथ शंकरशेट यांनी त्या मूर्ती गव्हर्नर ग्रँट यांना दाखविल्यावर त्यांनी न्यायालयाकडून पुनर्विलोकन करुन घेतले आणि आरोपींना शिक्षा झाली. तेव्हा दोन्ही समाजांनी आनंद व्यक्त केला. या प्रकरणामुळे त्यांचे संबंध वाढल्यामुळे डॉ. मोरहेड यांना घेऊन मुंबईतील आरोग्यासंबंधी गव्हर्नरांशी चर्चा केली. हिंदी जनतेला योग्य ते वैद्यकीय इलाज न झाल्यामुळे असंख्य माणसे नाहक मृत्युमूखी पडतात हे चौकशीअंती त्यांनाही आढळून आले होते. मेडिकल कॉलेज ही मानवी जीवनांत अत्यंत आवश्यक गोष्ट असल्यामुळे त्यांनी वैद्यक विषयाचे कॉलेज स्थापण्यास प्रोत्साहन दिले.

मेडिकल कॉलेज सुरु करण्यासंबंधी अर्ज

नेटिव्ह डिस्पेन्सरीच्या चालकांत नाना शंकरशेट हे एकमेव महाराष्ट्रीय सभासद होते. या संस्थेने गव्हर्नर यांच्याकडे मेडिकल कॉलेज सुरु करण्यासंबंधी अर्ज केला. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पत्राचा विचार करुन सर जमशेटजी यांची उदार देणगी व त्यांनी घातलेली अट एका विनंतीपत्राच्या रुपाने मुंबई सरकारच्या नजरेस आणली. त्याचप्रमाणे इस्पितळास जोडून मुंबईत एक मेडिकल कॉलेज स्थापन करण्यात यावे अशीही विनंती केली.

९ जुलै १८३८ रोजी पुण्याजवळील दापोडी येथे गव्हर्नर ग्रँट यांचा अचानक मृत्यू झाला. मुंबईत ही बातमी आल्यावर नानांना दुखःद धक्का बसला कारण मेडिकल कॉलेज सुरु करण्याचे आश्वासन दिले होते. श्रध्दांजली वाहण्यासाठी समितीची सभा आयोजित करण्यासाठी हालचाली सुरु केल्या. त्यांच्या जागी ॲक्टींग गव्हर्नरपदी जेम्स फॅरिस यांची नेमणूक झाली होती.

डॉ. ग्रँट यांना श्रध्दांजली

सर रॉबर्ट ग्रँट यांच्या आकस्मिक निधनामुळे, श्रध्दांजली वाहण्यासाठी २८ जुलै १८३८ रोजी, मुंबईतील नागरिकांची सभा टाऊन हॉलमध्ये भरली. सभेच्या अध्यक्षपदी नामदार जी. डब्ल्यू. अँडरसन होते. तेथे गव्हर्नरांचे स्मारक मेडिकल कॉलेज स्वरुपांतच होणे का जरुर आहे याचे दिग्दर्शन करताना जगन्नाथ शंकरशेट म्हणाले, 'सर रॉबर्ट ग्रँट यांच्या आकस्मिक निधनामुळे आपला एक कळकळीचा पाठिराखा गेला आहे. त्यांनी भिवंडी दंगली प्रकरणात न्याय मिळण्यासाठी मदत केली. आमच्या कल्याणासाठी व सुखी व्हावे यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. आमचे आरोग्य ठिक राहण्यासाठी ते परोपरीने झटले. औषधी शास्त्रांत पारंगत असे असंख्य लोक निर्माण होण्यासाठी ते झटून प्रयत्न करीत होते. ती लक्षांत घेतील असता त्यांचे स्मारक कोणत्या स्वरुपांत करावे हा प्रश्न सोडविणे फारसे बिकट नाही. आमच्या मुलाबाळांना व त्यानंतरच्या पिढयांना त्यांची स्मृती रहावी या दृष्टीने पार पाडण्यायोग्य जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे त्यांच्या नांवे मेडिकल कॉलेज स्थापन करणे हीच होय. आपल्या आयुष्याच्या अखेरीस याच कार्याचा ध्यास त्यांनी स्वतःस लावून घेतलेला होता. त्याच कार्याची पूर्तता केल्याने त्यांच्या आत्म्यास चिरशांती मिळणार आहे.' मुंबई सरकारने बॉम्बे नेटिव्ह डिस्पेन्सरीच्या उपयुक्त सूचनेचा सहानुभूतिपूर्वक विचार करुन आपल्या शिफारशीसह सर्व पत्रव्यवहार गव्हर्नर जनरलकडे पाठविला व तेथून हे सर्व प्रकरण विलायतेस बोर्ड ऑफ कंट्रोलकडे गेले.

जमशेटजी जिजीभाई यांना सर पदवी

ग्रँट मेडिकल कॉलेज विद्यार्थ्यांना, रुग्ण-तपासणी अनुभवासाठी मोठया इस्पितळाची गरज होती. जगन्नाथ शंकरशेट यांच्या पुढाकाराने सुरु झालेली बॉम्बे नेटीव्ह डिस्पेन्सरी अपुरी होती. जमशेटजी जिजीभाई यांना निर्यात व्यवसायातून भरपूर पैसा मिळविला होता. नवीन इस्पितळासाठी निधी गोळा करण्याची जबाबदारी

जगन्नाथ शंकरशेट यांच्यावर होती. वेळ काढून जमशेटजी यांच्याकडे गेले. तेथे मुंबईच्या विकासासाठी कोणत्या गोष्टींची प्राधान्याने गरज यासंबंधी चर्चा झाली. तेथे आपली धनदौलत दान करण्याची भूमिका सांगितली. 'धनदौलत मिळणे हे पूर्व-पुण्याईचे फळ होय, त्याचा विनियोग करण्याची जबाबदारी विश्वस्त या नात्याने आपले कर्तव्य आहे. हॉस्पिटलसाठी मोठी देणगी दिल्यास स्मारक करण्याची मागणी करता येईल.' जमशेटजी यांनी आपल्या मुलांशी चर्चा केल्यानंतर पुढील भेटीत सांगितले, 'नविन हॉस्पिटलला, माझे नांव देत असतील तर मी १ लाख रुपये देणगी देण्यास तयार आहे परंतु सरकारनेही तेवढीच रक्कम या कार्यासाठी द्यावी.' आश्वासन मिळाल्यामुळे, जगन्नाथ शंकरशेट यांनी हालचाली सुरु केल्या.

सर हर्बट कॉप्टन यांच्या अध्यक्षतेखाली टाऊन हॉलमध्ये सभा घेण्यात पुढाकार घेतला. तेथे मोठया हॉस्पिटलची आवश्यकता पटवून देण्याचे वक्तव्य केल्यावर जमशेटजी जिजीभाई यांनी व्यक्त केलेला मनोदय सांगितला. नविन हॉस्पिटलला, जमशेटजींचे नांव देत असतील तर ते १ लाख रुपये देणगी देण्यास तयार आहेत परंतु सरकारनेही तेवढीच रक्कम या कार्यासाठी द्यावी अशी अट ठेवली आहे. तोपर्यंत फक्त राजघराणे आणि प्रतिष्ठित ब्रिटिशांची नांवे संस्थाना देण्याची प्रथा होती. संस्थेचे शिष्टमंडळ गव्हर्नरांकडे गेले. त्यांच्यामार्फत हा प्रस्ताव कलकत्ता येथे गव्हर्नर-जनरल व बोर्ड ऑफ डायरेक्टर्सकडे पाठविला. कंपनी सरकारने, उदार दृष्टिकोन अंगिकारला. प्रोटोकॉल प्रमाणे असे स्मारक फक्त ब्रिटिश नागरिकत्त्व असल्यास करता येत होते. ती अट पूर्ण करण्यासाठी जमशेटजी जिजीभाई यांना सर हा किताब दिल्यास ते शक्य होणार होते. जमशेटजी जिजीभाई यांनी सार्वजनिक कार्यास भरपूर धन व वेळ दिला असल्याचे पुरावे पार्लमेंट कमिटीपुढे ठेवले. ते मान्य झाल्यावर जमशेटजी जिजीभाई यांना व्हिक्टोरिया राणीने सर ही पदवी १८४२ मध्ये दिली. जमशेटजी जिजीभाई आणि सरकारचा निधी आल्यावर इस्पितळ इमारत बांधकाम सुरु झाले.

इमारत नकाशाच्या ८० प्रती

डायरेक्टर बोर्डाने इस्पितळाची योजना उचलून धरल्यानंतर ते इस्पितळ कसे असावे? त्यांत कोणत्या सोयी असाव्या? इमारतीचा आकार व नकाशाच्या ८० प्रती गव्हर्नरांकडे आल्या. त्या १६ प्रमुख नागरिकांत वितरित केल्या. त्यांत २ महाराष्ट्रीय, ४ मुसलमान व १० पारशी होते. त्या काळांतील विचारवंतांची मुंबई सरकारने केलेली ही निवड अनेक दृष्टीनी महत्त्वाची होती.

या कार्यासाठी ५०,००० रुपये निधी जमविण्यांत आला. सरकारकडूनही आरंभी तेवढीच रक्कम मिळून १८४५ साली ग्रँट मेडिकल कॉलेजचे उद्घाटन करावयाचे ठरले. शवविच्छेदनाला पारशी तरुणांचा विरोध असल्यामुळे वैद्यकीय शिक्षणाकडे त्यांनी पाठ फिरविली. त्यावर नाना शंकरशेट यांनी तोड शोधून काढली. कॉलेजजवळ पारशी विद्यार्थ्यांसाठी एक खोली राखून शवविच्छेदन क्रियेनंतर तेथेच स्नान करुन शुद्धीकरण करुन घ्यावयाचे व मग व्यवहाराला लागावयाचे असे ठरले. या व्यवस्थेमुळे पारशींचा विरोध नाहीसा झाला. ते विद्यार्थी बहुसंख्येने कॉलेजमध्ये दाखल झाले. अभिमानाची गोष्ट ही की ३ हिंदू विद्यार्थी धैर्याने पुढे आले आणि कॉलेजांत नांवे नोंदविली. त्यांत पहिले नांव भाऊ दाजींचे होते, दुसरे २ विद्यार्थी म्हणजे अनंत चंद्रोबा डुकले व आत्माराम पांडुरंग हे होत.

उद्घाटन बॉम्बे बोर्ड ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष

उद्घाटन बॉम्बे बोर्ड ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष न्यायमूर्ती सर अर्स्किन पेरी यांनी केले. ते म्हणाले, 'शिक्षणासारख्या पवित्र कार्याला आपला संपूर्ण पाठिंबा देण्यासाठी एतद्देशीयांतील मोठया माणसांनी जाहीर रीतीने पुढे यावे व आपली सक्रिय सहानुभूती दर्शवावी ही खरोखर मोठया समाधानाची घटना आहे. सरकार आपल्या स्वार्थासाठी शिक्षणप्रसार करु पहात आहे, त्यांत सरकारचा काहीतरी डाव आहे, अशा प्रकारच्या खोडसाळ कल्पना मुंबईसारख्या शहरांतीलही लोकांत वावरत आहेत. अशा स्थितीत हिंदु व पारशी समाजांतील पुढाऱ्यांनी शिक्षणकार्याला उत्तेजन देण्यासाठी स्वयंस्फूर्तीने पुढे यावे हे पाहून मला आनंद होत आहे. याचे पारितोषिक त्यांना योग्य वेळी मिळाल्याशिवाय रहाणार नाही.'

ग्रँट मेडिकल कॉलेजच्या ३ ऱ्या वर्षी, चेअरमन सर अर्स्किन पेरी यांच्या अध्यक्षतेखाली, ५ एप्रिल १८४८ रोजी बक्षिस समारंभ आयोजित केला. या प्रसंगी डॉ. मोरहेड म्हणाले, 'या शहरातील सर जमशेटजी जिजीभाई, जगन्नाथ शंकरशेट व फ्रामजी कावसजी यांच्यासारख्या लोक धुरीणांस या संस्थेचे महत्त्व पटलेले असल्यामुळे, त्यांचे या संस्थेच्या भवितव्याकडे सतत लक्ष लागून राहिलेले आहे.'

'या शहरांतील जगन्नाथ शंकरशेट, जमशेटजी जिजीभाई व फ्रामजी कावसजी यांचे संस्थेच्या भवितव्याकडे सतत लक्ष राहिलेले आहे. यांच्याकडुन उत्तेजनपत्रे आलेली आहेत.' त्यांपैकी जगन्नाथ शंकरशेट हे आपल्या पत्रांत लिहितात, 'ग्रँट मेडिकल कॉलेज ही संस्था लोकप्रिय व यशस्वी व्हावी अशी माझी मनापासून इच्छा आहे. या देशाला ग्रँट मेडिकल कॉलेज ही संस्था अत्यंत उपकारक होऊन राहाणार आहे हे निःसंशय होय. विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने पुढे येऊन या संस्थेचा फायदा घेतला पाहिजे. त्यांना उत्तेजन मिळावे या हेतूने अभ्यासक्रमांत उपयोगी पडतील असे ग्रंथ बक्षिसादाखल देण्याचा माझा विचार आहे. दर ६ महिन्यानी कांही ठराविक क्षेत्रांत विशेषतः रूग्णालयांतील कामात ज्यांनी विशेष प्रावीण्य दाखविले असेल अशा विद्यार्थ्यांना ही बक्षिसे देण्यांत यावी अशी विनंती आहे.'

न्या सर अर्स्किन पेरी यांनी तत्कालीन परिस्थितीत नाना शंकरशेट व पारशी समाजांतील त्यांचे सहकारी किती महत्त्वाची कामगिरी पार पाडीत होते याची वास्तव कल्पना करून देणारे आहे. ते म्हणाले 'शिक्षणासारख्या पवित्र कार्याला आपला संपूर्ण पाठिंबा देण्यासाठी एतद्देशीयांतील मोठया माणसांनी जाहीर रीतीने पुढे यावे व आपली सक्रिय सहानुभूति दर्शवावी ही खरोखर मोठया समाधानाची घटना आहे. हिंदु व पारशी समाजांतील पुढाऱ्यांनी शिक्षणकार्याला उत्तेजन देण्यासाठी स्वयंस्फूर्तीने पुढे यावे हे पाहून मला आनंद होत आहे. याचे पारितोषिक त्यांना योग्य वेळी मिळाल्याशिवाय रहाणार नाही.'

पहिला पदवीदान समारंभ

मेडिकल अभ्यासक्रम ५ वर्षाचा पूर्ण झाल्यानंतर १५ एप्रिल १८५१ रोजी या महाविद्यालयाचा पहिला पदवीदान समारंभ बॉम्बे बोर्ड ऑफ एज्युकेशनचे सर अर्स्किन पेरी यांच्या अध्यक्षतेखाली मोठया थाटांत पार पडला. त्या वेळी प्राचार्य डॉ. मोरहेड म्हणाले, 'हा दिवस, महाविद्यालयाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी नमूद करुन ठेवण्यासारखा आहे. हे रोपटे फुलांफळाला यावे म्हणून जे झटले त्यांना धन्यवाद. आज, ह्या रोपटयाला आलेली मधुर फळे पश्चिम भारतांतील जनतेला अर्पण करण्यांत यावयाची आहेत. यशस्वी ठरलेले पहिले ८ पदवीधर आपल्यासमोर बसलेले आहेत. ज्यांच्या स्मरणार्थ ही संस्था स्थापन झाली त्या सर रॉबर्ट ग्रँट यांचे औषधी-विद्येकडे फार बारकाईने लक्ष लागून राहिले होते. दोषपूर्ण औषधोपचारामुळे या देशांतील असंख्य लोकांस इहलोकची यात्रा अकाली संपवावी लागते हे पाहून त्यांचे अंतःकरण तीळ तीळ तुटत असे. यापुढील काळांत या महाविद्यालयांतून बाहेर पडणारे पदवीधर देशाला उपकारक होऊन रहातील अशी मला आशा वाटत आहे.'

बॉम्बे युनिव्हर्सिटीची स्थापना होताना जगन्नाथ शंकरशेट यांचे नांव युनिव्हर्सिटीच्या घटनेमध्ये समाविष्ट केले होते. त्यांनी ग्रँट मेडिकल कॉलेजला सलंग्नता दिल्यामुळे भारतातील पहिले एम.बी.बी.एस. पदवीधर या कॉलेजमधून दिले गेले.

वैद्यकीय विषयांचे शिक्षण मराठी भाषेंतून

गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांच्याशी बोलणे करुन प्रयोगादाखल प्रथम मराठीत वैद्यकीय शिक्षण देण्याची सुरुवात केल्यास जनतेचा कसा फायदा होणार आहे हे जगन्नाथ शंकरशेट यांनी त्यांस पटवून दिले. त्यांच्या शिफारशीवरुन १८६१ साली ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय विषयांचे शिक्षण मराठी भाषेंतून देण्याचा उपक्रम सुरु झाला. या वर्गांत शिक्षक या नात्याने आरंभी सब-असिस्टंट सर्जन डॉ. नारायण दाजी लाड व डॉ. भिकाजी अनंत चोबे हे काम करीत असत. ते महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांस फार मेहनत घेऊन शिकवीत असत. देशी भाषेंत वैद्यकीय शिक्षण देण्याचा पहिला उपक्रम कलकत्ता येथे झाला. मुंबईतील ग्रँट मेडिकल कॉलेजमधील मराठी वैद्यक वर्गाचा शक्य तो जास्त विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा या हेतूने नाना शंकरशेट यांनी प्रत्येकी दरमहा १० रुपयांच्या दोन शिष्यवृत्त्या चालू केल्या. तसेच त्या शिष्यवृत्त्यांना कायमचे स्वरुप यावे या हेतूने त्यांनी ५ हजार रुपये देणगी दिली.

ग्रँट मेडिकल कॉलेजला; सेंट जॉर्ज हॉस्पिटल, गोकुळदास तेजपाल हॉस्पिटल आणि कामा हॉस्पिटल संलग्न आहेत. जे. जे. हॉस्पिटलच्या ४० एकर जागेत भव्य लायब्ररी, बाटलीवाला बाळंतपणाचे हॉस्पिटल, डोळयांचे हॉस्पिटल, विद्यार्थी, विद्यार्थीनी व नर्सेसची हॉस्टेल आहेत.

रोह्याचे डॉ. श्रीनिवास वेदक व आपल्या संस्थेचे माजी अध्यक्ष माणगांवचे डॉ. मदन निकम हे ग्रँट मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी, आम्हाला, डॉ. ओ.पी.कपूर हे मुंबईतील सर्व डॉक्टरांचे आवडते मेडिसिनचे प्राध्यापक, त्यांनी एकदा आमच्या बॅचला हायपो-थायरॉईडची रुग्ण बाई दाखविली. तपासून झाल्यानंतर त्यांनी अचानक आपल्या खिशातून १० रु. काढून दिले. सर्व विद्यार्थ्यांवर त्याचा परिणाम झाल्यामुळे आम्ही आमच्या जीवनात माणगांव, तळे, रोहा ह्या ठिकाणी व्यवसायाला सुरुवात केली. आदीवासी बाईच्या गळयातील मंगळसूत्र दोरीने ओवले असेल तर आम्ही फी घेत नाही. आमच्या १९६८ च्या काळात डॉ. व्ही.एन.शिरोडकर, डॉ.बी.एन.पुरंदरे, डॉ. श्रीखंडे असे भारतांतील महान प्राध्यापक होते.

डॉ. श्रीनिवास वेदक
उपाध्यक्ष, कोकण इतिहास परिषद

डॉ. श्रीनिवास वेदक